**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
*A.Y. 2024-2025*

# प्रा. ए. व्ही. देशपांडे यांच्या पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

**पाटण :** येथील ज्येष्ठ पत्रकार, सेवानिवृत्त ग्रंथपाल प्रा. ए. व्ही. देशपांडे यांनी लिहिलेल्या 'पत्रकारितेतील माझी ५० वर्षे' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत शनिवार २२ मार्च रोजी सायंकाळी चार वाजता संपन्न होत आहे. यावेळी साहित्यप्रेमींसह सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांनी केले आहे. येथील महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्यावतीने येथील बाळासाहेब देसाई कॉलेजच्या बी.सी.ए.सभागृहात सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटणचे अध्यक्ष तसेच कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर असून यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार, ख्यातनाम वक्ते डॉ. सागर देशपांडे (पुणे) उपस्थित राहणार आहेत. प्राचार्य डॉ. एस. डी.पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी साहित्यप्रेमींसह सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. जे. ऐवळे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. सौ. हेमलता काटे व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांनी केले आहे.